# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

फोन ०२०-२५६०१२०४

website : www.unipune.ac.in

गणेशखिंड,

पुणे – ४११ ००७

email : dyrst@pun.unipune.ac.in


**संदर्भ : परीक्षा/एसॲण्डटी/ 1320** **दिनांक : 25 नोव्हेंबर, २०१९**

**अत्यंत महत्वाचे व तातडीचे**

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था
पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हा

**विषय : शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रमाचे श्रेयांक पध्दतीचे निकालाबाबत..**

महोदय/महोदया,

शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून पदवी अभ्यासक्रमाला श्रेयांक पध्दत लागू करण्यात आली आहे. यासंदर्भात झालेल्या मार्गदर्शन शिबिरांदरम्यान बहुतांश प्राचार्य व परीक्षा अधिका-यांनी विद्यापीठाने अंतर्गत सत्रांत परीक्षेचे गुण स्वीकारुन प्रथम वर्षाचा निकाल विद्यापीठामार्फत तयार करण्यासंदर्भात विचारणा/विनंती केली होती.

महाविद्यालयांनी केलेल्या विनंतीचा विचार करुन परीक्षा विभागाने प्रथम वर्षाचा निकाल तयार करण्यासाठी संगणक प्रणाली विकसित केली असून, महाविद्यालयांना अंतर्गत व त्याचप्रमाणे बहि:स्थ परीक्षेचे गुण भरता येतील अशी व्यवस्था करण्यात आली आहे. विद्यापीठाकडे गुण प्राप्त झाल्यावर विद्यापीठ निकालाची प्रक्रिया पूर्ण करुन महाविद्यालयाच्या लॉगीनवर निकालाचे लेजर व गुणपत्रकाची सॉफ्ट कॉपी उपलब्ध करुन देण्यात येईल. महाविद्यालयांनी सदर गुणपत्रिका पूर्वीप्रमाणेच महाविद्यालयाच्या स्टेशनरीवर छापून विद्यार्थ्यांना वितरीत करावयाच्या आहेत. अंतर्गत व बहि:स्थ परीक्षेचे गुण भरण्यासाठीची व्यवस्था intmarks.unipune.ac.in या लिंकवर उपलब्ध आहे. गुण भरण्यासंदर्भात सविस्तर सूचना सदर लिंकवरील माहिती पुस्तिकेत (User Manual) सविस्तर देण्यात आलेल्या आहेत. सदर अंतर्गत व बहि:स्थ परीक्षेचे गुण हे संबंधित विषय शिक्षकांनी त्यांच्या BCUD Login चा वापर करुन भरावयाचे आहेत. मा.प्राचार्य व विभागप्रमुख यांनी सर्व विषयांसाठी बॅचेस तयार करणे व विषयशिक्षकांच्या नियुक्त्या करणे ही कामे पार पाडावयाची आहेत.

मा.प्राचार्य/संचालक यांना विनंती करण्यात येते की, सदर पत्र महाविद्यालयातील/संस्थेमधील सर्व संबंधित विभागप्रमुख, विषय शिक्षक व इतर शिक्षक/शिक्षकेतर सेवक यांच्या निदर्शनास आणून द्यावे. तसेच विहित कालमर्यादेत सर्व अंतर्गत व बहि:स्थ गुण भरले जातील याची दक्षता घ्यावी. यासंदर्भात काही तांत्रिक अडचणी असल्यास मोबाईल नं. ९५७९२९०१७८ अथवा ९५७९२६८९४० यावर संपर्क साधावा. तसेच काही प्रशासकीय अडचण आल्यास परीक्षा विभागाशी संपर्क साधावा.

आपला

AS 25/11

(डॉ.अरविंद दि.शाळिग्राम)
प्रभारी संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ